SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000. www.unishivaji.ac.in, E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in, E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र.: शिवाजी वि/संलग्नता/टी-२/एसएससी/वि.प.वि.क्र.०३ दि.२०.०६.२०२४/ दि. 11 JUL 2024

No - 1673

प्रति,
मा. प्राचार्य,
जयवंत इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट,
वाठार-कराड, ता.कराड,
जि.सातारा.

**विषय : आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरण प्रकाराबाबत विद्यापीठाची मान्यता.**

**संदर्भ : आपला जा.क्र. KFM/JIM/४२१४/२०२३ दि.०१/०९/२०२३ रोजीचा प्रस्ताव.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, २०२४ पासून खालील संलग्नीकरण प्रकार व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाले होते. छाननी समितीने नमुद केलेल्या अटी पुर्ततेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाकडून सदर प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम/शाखा | विद्यापीठाची मान्यता | ६५% पेक्षा कमी गुणांकन प्राप्त झालेले वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | नुतनीकरण | एम.बी.ए. भाग १, २ (१८०) | जून २०२४ पासून एक (०१) वर्षासाठी | प्रथम वर्ष - सन २०२१-२२<br>प्रपत्र 'अ' - ५५.३३%<br>व्दितीय वर्ष सन २०२३-२४<br>प्रपत्र 'अ' - ५७.१४%<br>त्रितीय वर्ष सन २०२४-२५<br>निरंक |

**छाननी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. अर्हताधारक प्राचार्यांची नेमनूक करणेत यावी.
२. विद्यार्थ्यान्साठी स्वच्छ व शुध्द पाण्याची सोय करण्यात यावी.
३. AICTE नियमानुसार नियतकालीके खरेदी करण्यात यावीत.
४. ERP/LMS Software खरेदी करण्यात यावे.

**टिप :**

१. नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार प्रस्तावाच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी विद्यापीठास सादर केलेल्या गुणांकनानुसार, छाननी समितीने दिलेला अभिप्राय व आपल्या महाविद्यालयास नियमित प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक (आवश्यकतेनुसार) आणि सबंधित अभ्यासक्रमामध्ये आवश्यक असणा-या शिक्षक पदांच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत केलेल्या नियुक्त्या, शिक्षकेत्तर पदांच्या नियुक्त्या आणि इतर उपलब्ध आवश्यक भौतिक सुविधा इ. अवलोकनी घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार यास मान्यता दिली आहे.

...२

२. आपल्या महाविद्यालयास/संस्थेस आवश्यक असणारे नॅक/एनबीए मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन केले नसल्यास ते त्वरित करून घेणे बंधनकारक राहील. याबाबतची पूर्तता झाली नसल्यास पुढील नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून पुढील सलग तीन वर्षामध्ये प्रपत्र 'अ', 'ब' किंवा 'क' मध्ये ६५% पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १२० अन्वये संलग्नीकरण रद्द करण्याबाबतच्या प्रक्रियेचा प्रस्ताव विद्यापीठ अधिकार मंडळासमोर सादर करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची/नैसर्गिक विस्ताराची मान्यता ही छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह **अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा.**

**तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासु,

डॉ.पी.एस.पांडव
उपकुलसचिव
संलग्नता/टी-२ विभाग

प्रत :- १. पात्रता विभाग, २. संबंधित परीक्षा विभाग, ३. परीक्षक नियुक्ती विभाग, ४. अभ्यास मंडळे विभाग, ५. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग, ६. पी.जी. प्रवेश.